# असा होईल दुष्काळमुक्त मराठवाडा

**२०१२ पासुन सततच्या दुष्काळामुळे मराठवाडयाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीनंतर शासनाने अवलंबविलेले जलविषयक धोरण व विविध योजना मराठवाडयाला पुरसे पाणी देवु शकलेल्या नाहीत. जलसंपत्ती विकासाकरिता एकात्मिक जलनीतीसह उपलब्ध सर्व जलस्त्रोताचा सर्वसमावेशक लोकचळवळीच्या माध्यमातुन कार्यक्षम व उत्पादक वापर केल्यास, सिंचन क्षमता पन्नास टक्यापर्यत निर्माण होईल. यामुळे दुष्काळमुक्त मराठवाडा होण्यास वेळ लागणार नाही. यासाठी गरज आहे ती फक्त राजकीय ईच्छाशक्तीची. सद्या विधानसभा निवडणुकीची चर्चा सगळीकडे आहे. सर्वच राजकीय पक्षानी दुष्काळमुक्त मराठवाडयाचे लेखी आश्वासन आपल्या जाहिरनाम्यातुन जनतेला द्यावे ही आपेक्षा.**

२०१२ सालापासुन सततच्या दुष्काळामुळे मराठवाडयाचे कधीही भरून न येणारे नुकसान झालेले आहे. तीव्र पाणी टंचाई, पिण्यासाठी – पशुधनासाठी – शेतीसाठी, पाण्याचा अभाव जळालेल्या फळबागा, रोजगाराअभावी होणारे स्थलांतर, दुषित पाण्यामुळे आरोग्यविषयक, शैक्षणिक प्रश्न निर्माण झाले आहेत. या विविध प्रश्नांच्या दुष्ट चक्रामुळे शेतकरी आत्महत्यापर्यत या समस्येने उग्र स्वरूप धारण केले आहे. पाण्याअभावी मराठवाडयामध्ये वाळवंटीकरणाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. या सर्वांच्या केंद्रस्थानी पाणी प्रश्न आहे. यापुढे असा दुष्काळ सहन करण्याची क्षमता ग्रामीण समाजात राहीलेली नाही. आणि समाज म्हणुन ते परवडणारेही नाही. महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीनंतरची जलविषयक धोरणे व विविध योजना मराठवाडयाला पुरेसे पाणी देऊ शकलेल्या नाहीत. हा दुष्काळ कायमचा संपला पाहीजे, यावर विचार व कृती करण्याची वेळ आलेली आहे.

**वस्तुस्थिती :–**

सध्याचे मराठवाडयातील सिंचन क्षेत्र १८ टक्के आहे. निर्सगाने महाराष्ट्राला असमतोल पद्धतीने पाणी उपलब्ध करून दिले आहे. विभाग निहाय विचार केल्यास पश्चिम महाराष्ट्राचे क्षेत्र ४६ टक्के आहे तर पाणी ७६ टक्के, विदर्भाचे क्षेत्र २८ टक्के तर पाणी १८ टक्के व मराठवाडयाचे क्षेत्र २६ टक्के तर पाणी फक्त ६ टक्के अशी मराठवाडयाची स्थिती आहे. साधारणपणे प्रति हेक्टर ३००० घन मीटर पाण्याची उपलब्धता आवश्यक आहे. परंतु मराठवाडयात याची उपलब्धता फक्त १३८३ घन मीटर प्रति हेक्टर एवढी आहे. दरडोई भाषेत बोलायचे झाल्यास १७०० घन मीटर पाणी दरडोई असणे आवश्यक असतांना मराठवाडयात

फक्त ४३८ घन मीटर दरडोई पाणी आहे. मराठवाडयाचा ६९ टक्के भाग हा कायम दुष्काळी असुन रंगनाथन समिती अहवालानुसार ७६ पैकी ५३ तालुके अवर्षण प्रवण क्षेत्रात येतात. मराठवाडयातील बहुतांश लोकसंख्येची उपजिविका ही शेती व शेतीवर आधारीत उद्योगावर अवलंबुन आहे. शेतकऱ्यापैकी ८० टक्के शेतकरी हे अल्पभुधारक आहेत. बहुतांश शेती ही पर्जन्यछायेवर आधारीत आहे. त्यामुळे पाणी प्रश्न निकाली निघाल्याशिवाय मराठवाडयाचा शाश्वत विकास शंक्य नाही. यासाठी मराठवाडा पाणी प्रश्नाचा सखोल अभ्यास करून एकात्मिक जलनीती स्वीकारण्याची आवश्यकता आहे.

## आजतागायत जलसंपत्ती विकासाचे प्रयत्न :–

महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीनंतर विविध आयोग, समिती, यांच्या शिफारसी शासनाने अवलंबविलेले जलविषयक धोरण, यामुळे मराठवाडयात संध्यस्थितीत मोठे ११, मध्यम ७५, लघु ७४९, एवढे प्रकल्प तर गोदावरीवर १३, मांजरा, तेरणा, रेणावर २४ असे एकुण ८७२ प्रकल्प आहेत. या सर्व धरणाची एकत्रित साठवण क्षमता ३०२ टीएमसी एवढी निर्माण झालेली आहे. याच्या जोडीलाच महाराष्ट्राने देशाला दिलेली महत्वाची रोजगार हमी योजना १९७३ पासुन राबविण्यात येत आहे. १९८९ पासुन पाणवहाळ, अवर्षण प्रवण कार्यक्रम, हरीयाली, वसुंधरा, आदर्श गाव योजना, मराठवाडा मिशन, इन्डो जर्मन पाणलोट प्रकल्प इत्यादीच्या माध्यमातुन पाणलोटासाठी उपलब्ध पन्नास लाख हेक्टर पैकी एकोनतीस लाख हेक्टर म्हणजेच ५८ टक्के क्षेत्रावर माथा ते पायथा उपचार/कामे करण्यात आलेली आहेत.

याचबरोबर जवळपास १२००० पाझर तलाव, ३०४८ कोल्हापुरी बंधारे, सिंचन विभाग, लघु पाटबंधारे स्थानिक स्तर, सामाजीक वनीकरण, यांच्यामार्फत साखळी पद्धतीचे सिमेंट बंधारे मोठया प्रमाणात करण्यात आलेली आहेत. कृषि विभागाच्या माध्यमातुन सुक्ष्म सिंचन योजना, विशेषतः फळबागासाठी राबविण्यात आलेली आहे.

## आजतागायतच्या प्रयत्नातुन अनुत्तरित राहिलेले प्रश्न

उपलब्ध सर्व जलस्त्रोताचा वापर करूनही मराठवाडयाचे सिंचन क्षेत्र अठरा टक्के एवढेच असुन उर्वरीत ब्याऐंशी टक्के शेतीला आपण पाणी देऊ शकलो नाही.

१. आजही मराठवाडयातील निम्या जनतेला पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नाही.
२. पर्जन्यछायेवर अवलंबुन असलेल्या ब्याऐंशी टक्के शेती क्षेत्राला संरक्षित सिंचनासाठीही पाणी उपलब्ध होत नाही.
३. पाण्याअभावी मराठवाडयातील पन्नास टक्के फळबागा जळाल्या.
४. पाण्याअभावी स्थानिक युवकांना रोजगार न मिळाल्यामुळे स्थलांतर वाढले.
५. पाण्याअभावी विविध प्रश्नाच्या दुष्टचक्रामुळे शेतकरी आत्महत्या थांबु शकल्या नाहीत.

**कुठे चुकले :—**

आजतागायतच्या अथक प्रयत्नातुन आपण निम्या जनतेला पिण्यासाठी पाणी देऊ शकलो नाही व ब्याऐंशी टक्के शेती क्षेत्र पाण्याची वाट पाहत आहे. सर्वसामान्य माणसाला प्रश्न पडतो की, करोडो रूपये खर्च करूनही पाणी गेले कुठे?

**१. कागदावरचे पाणी.**

मोठया धरणापासुन ते छोटया सिमेंट बंधाऱ्यापर्यत अंदाजपत्रकात जेवढा पाणीसाठा दाखविला जातो मात्र प्रत्यक्षात तेवढा पाणीसाठा नसतो. यातील बहुतांश पाणी हे अंदाजपत्रकीय कागदावरच असते. तांत्रीकदृष्टया चुकीच्या साईट निवडल्यामुळेही पाणीसाठयावर मोठया प्रमाणात परिणाम झालेला आहे.

**२. तांत्रीक दोष व गुणवत्तेचा अभाव.**

जलसंधारणाची व सिंचन बंधाऱ्याची कामे तांत्रीकदृष्टया शास्त्रशुद्ध न झाल्यामुळे व कामाचा दर्जा सुमार असल्यामुळे अपेक्षित पाणीसाठा मिळत नाही. खर्च मात्र पूर्ण होतो.

**३. समन्वयाचा अभाव.**

पाण्याशी संबंधित जलसंपदा — जलसंधारण, कृषि, पाणीपुरवठा विभाग या विभागात समन्वय नसल्यामुळे प्रकल्पपुर्तीसाठी प्रदीर्घ काळ लागतो. एकात्मिक जलव्यवस्थापना अभावी परिणामकारकता दिसुन येत नाही.

**४. लोकसहभाग व देखभाल दुरूस्तीचा अभाव.**

जलविषयक योजनात जनतेचा सक्रीय सहभाग अपेक्षित आहे. कॅनॉल, बंधारे, पाझर तलाव, पाणीपुरवठा योजना यांच्या कामाची देखभाल व दुरूस्तीची कामे न झाल्यामुळे पाण्याचा अपव्यय मोठया प्रमाणात होतो.

**५. पाण्याचा अपव्यय.**

आपल्याकडे सर्वच स्तरावर पाण्याचा अपव्यय मोठया प्रमाणात होतो. जागतिक बॅकेच्या अहवालानुसार पाणीपुरवठा योजनेत पन्नास टक्के तर सिंचन क्षेत्रात पाणी वापर कार्यक्षमता तीस टक्के आहे. इस्त्रायलमध्ये ती ९५ टक्के आहे.

**उपाय :—**

वरील आजतागायत जलविषयक धोरणाचा व विविध योजनांचा आढावा घेतल्यानंतर एकांगी पद्धतीने विचार न करता खालील एकात्मिक जलनीतीचा अवलंब करून मराठवाडा दुष्काळमुक्त होऊ शकतो.

१. मराठवाडयातील बेचाळीस टक्के पाणलोट क्षेत्र उपचारापासुन वंचित आहे. या वंचित क्षेत्रावर इन्डोजर्मन – नाबार्ड धर्तीवर माथा ते पायथा पाणलोट उपचाराद्वारे विकेंद्रित जलसाठे व सुपीक मातीचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे.
२. शासनाच्या विविध योजनांतर्गत मराठवाडयातील प्रगतीपथावरील तसेच अपुर्ण धरणाची कामे त्वरित पुर्ण करण्यात यावी.
३. मराठवाडयाच्या न्याय हक्काचे आंतरखोरे पाणी वहन योजनेअंतर्गत पश्चिम वाहिनी नद्याचे व कृष्णा खोऱ्यातील पाणी मराठवाडयाला त्वरित उपलब्ध करून द्यावे.
४. आंतरखोरे पाणी वहन योजनेअंतर्गत उपलब्ध होणारे पाणी मराठवाडयात सर्वदुर पोहचविण्याकरीता वॉटर ग्रीड योजना त्वरित पुर्ण करावी.
५. पाण्याच्या कार्यक्षम व उत्पादक वापराकरिता मराठवाडयातील शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचनासाठी शासनाने घोषीत केलेले अनुदान त्वरित उपलब्ध करून द्यावे.
६. मराठवाडयातील आजतागायत पुर्ण झालेल्या अनेक धरणे, कॅनॉल, पाझर तलाव यांची दुरूस्ती, कोल्हापुरी बंधाऱ्याचे गेट बसविणे, अनेक धरणातील गाळ काढणे ही कामे युद्धपातळीवर करण्याची आवश्यकता आहे.
७. मराठवाडयातील स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कार्यालये व उद्योग क्षेत्रास छतावरील पाण्याचे संकलन – संवर्धन व पाण्याचा पुनर्वापर बंधनकारक करावे.

**लोकचळवळ**

मराठवाडयाचे सद्याचे सिंचन क्षेत्र अठरा टक्के आहे. एकात्मिक जलनीतीअंतर्गत वरील बाबींसह सर्वसमावेशक लोकचळवळीच्या माध्यमातुन कालबंद्ध नियोजनासह प्रभावी अमलबजावनी करून, उपलब्ध सर्व जलस्त्रोताचा कार्यक्षम व उत्पादक वापर केल्या पन्नास टक्यापर्यत सिंचन क्षमता निर्माण होईल. यामुळे मराठवाडयाची अर्थव्यवस्था काही हजार कोटीने सुधारून, दुष्काळमुक्त मराठवाडा होण्यास मदत होणार आहे. सद्या विधानसभा निवडणुकीची चर्चा सगळीकडे आहे. मराठवाडयातील जनतेचे हे स्वप्न पुर्ण करण्याकरिता सर्वच राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात लिखित आश्वासन मराठवाडयाच्या जनतेला द्यावे, एवढी अपेक्षा.

नरहरी शिवपुरे
अध्यक्ष
मराठवाडा पाणी परिषद